**एहसास**

# संस्कृती

प्रज्ञा
दया
पवार

ही संस्कृती आहे
माझी पिढ्यान्‌पिढ्यांची माता

तिच्या गर्भाशयात ती मला वाढवते
तडफडत्या मांड्यांतून रक्ताळून मला जन्म देते
जन्मताच माझ्या गळ्याला ती नख लावत नाही
मायेनं माझं भरण-पोषण करते
संस्कृतिमाता माझ्यावर अंगाई ते अंताईपर्यंत
सुफळ संपूर्ण संस्कार करते

दिसामाजी मी वाढू लागते
मी सूर्यबिंब पकडायला जात नाही
कोवळे हात पोळून घेत नाही
मी चंद्राशी खेळण्याचा हट्ट धरत नाही
देहभान हरपू देत नाही
मी चांदण्यांचं परकर-पोलकंही मागत नाही
नव्हाळीतल्या नशील्या जादूत गुंतून राहत नाही
मी दिवसाला दिवस
आणि रात्रीला रात्र म्हणू लागते
संस्कृतिमाता मला फॅण्टसीचं विणकाम शिकवते
नातिचरामीचा शेंदूर फासलेला चिवट दोर
अलगद्‌ माझ्याभोवती आवळू लागते

मी धडपडते
आक्रंदून उठते
माते!
मला नको तुझ्या मुखवट्याचा काळा बुक्का
नको तुझं अपरंपार जडशीळ स्वत्व
नको तुझ्या आसाची शून्यवत्‌
अलौकिक पोकळी
तू आहेस निरंकुश सत्ता
तू आहेस जात प्रसवणारं प्रवेशद्वार
तू आहेस आस्ते आस्ते फैलावत
जाणारं विद्राव्य
तुझं मायावी रूप काबीज करतं मला
माझ्या अव्यक्ताला
माझ्या आधिभौतिकाला

माते!
मुक्ती दे मला
या सर्वंकष रितेपणातून
जगू दे मला
नेणिवेतला उत्कट अंधार
भोगू दे मला
कर्त्याच्या अभावाचा गंधार
पाहू दे मला
दुःखाची पाळंमुळं
इत्थंभूत पसरणारी
होऊ दे मला
तुझी सर्वात लाडकी लेक
तुझी सावली नाकारणारी.

उत्कट जीवघेण्या धगीवर (२००२) या कवितासंग्रहातून.